यशोगाथा

# खेडगावच्या 'अतुल नर्सरी'ची 'अतुलनीय' वाटचाल

**विनायक फंड**
खेडगाव,
ता. दिंडोरी, जि. नाशिक
**नितीन चव्हाण**
पालखेड बंधारा,
ता. दिंडोरी, जि. नाशिक





श्री. बाळासाहेब (अण्णा) जेऊघाले यांनी अमोल (अतुल) आणि रोहित या उच्चशिक्षित सुपुत्रांच्या मदतीने नर्सरीचा शाखाविस्तार मोठ्या कल्पकतेने केला आहे.




श्री. बाळासाहेब (अण्णा) जेऊघाले यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली कार्यरत असणाऱ्या या 'हरित सेने'च्या मदतीनं बहरली आहे अतुल नर्सरी...

खेडगाव (ता. दिंडोरी, जि. नाशिक) येथील श्री. बाळासाहेब (अण्णा) जेऊघाले यांची स्वतःची द्राक्षबाग होती. प्रारंभी आठ-दहा वर्षे चार मित्रांनी एकत्र येऊन द्राक्षे निर्यात केली. त्यानंतर काही वर्षे बेदाणा निर्मितीही केली. २००६ साली ते नर्सरीकडे वळले. सुरुवातीला अवघ्या चार गुंठ्यांवर द्राक्षरोपे तयार केली. रोपांची संख्या होती फक्त दहा हजार. आज मात्र दहा एकर जमिनीवर साडेतीन लाख रोपांची क्षमता आहे. जुन्या- नव्या अशा ३५ जातींची कलमं म्हणजे 'अतुल नर्सरी'ची 'अतुलनीय' कामगिरी होय. पाच एकर जागेवर मातृवृक्ष तर पाच एकरांमध्ये एका एकरावर पॉलिहाऊस तसेच शेततळे. त्याचबरोबर कामगारांना राहण्यासाठी खोल्या, पाण्याचे सुनियोजित व्यवस्थापन, कार्यालय असा सारा विस्तार झाला आहे. ही वाटचाल इतरांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल...

तसे बघता खेडगाव हे दिंडोरी तालुक्यातील (जि. नाशिक) द्राक्ष बागायतदारांचे म्हटले जाणारे समृद्ध गाव. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातही नावाजलेले. अशा सधन खेडगावातील वारकरी संस्काराचा वारसा लाभलेल्या श्री. बाळासाहेब जेऊघाले (अण्णा) यांची वणी रस्त्यावरची 'अतुल नर्सरी' गेल्या आठ वर्षांपासून बघण्यात आहे. तिची हिरवीगार, समृद्ध वाटचाल निश्चितच सुखावणारी आहे.



श्री. जेऊघाले यांची स्वतःची द्राक्षबाग होती. प्रारंभी आठ-दहा वर्षे चार मित्रांनी एकत्र येऊन द्राक्षे निर्यात केली. त्यानंतर काही वर्षे बेदाणा निर्मितीही केली. २००६ साली ते नर्सरीकडे वळले. सुरुवातीला अवघ्या चार गुंठ्यांवर द्राक्षरोपे तयार केली. रोपांची संख्या होती दहा हजार. मात्र त्या दहा हजारातली केवळ अडीच हजार रोपेच तग धरून राहिली! खरे तर हा प्रयोग धाडसाचा होता. कारण शेतकरी बाग लावतो, साधी हुंडी आणतो आणि नंतर पाहिजे त्या जातीचे कलम करतो. म्हणजे आजही तसेच करावे लागते; पण यातून जी काही झाडे आहेत त्यातून थोड्याफार प्रमाणात काही झाडे मरतात आणि त्याठिकाणी गॅप तयार होतात. अशा ठिकाणी मग कलम केलेली रोपे उपयोगी ठरतात.

हा प्रयोग सुरू केला तेव्हा, किंबहुना अगदी २०१५ पर्यंत बहुतेक शेतकरी अशी कलम- रोपे यशस्वी होत नाहीत या गैरसमजात होते. एवढेच नाही तर काहींची तशी मानसिकताच तयार झाली होती. अशा परिस्थितीत अण्णांनी हा प्रयोग सुरू केला. २००७ ला स्वतःच्या द्राक्षबागेत ती कलम केलेली रोपे लावली, यशस्वी झाले. गावातील एका शेतकऱ्यानेही याचा आपल्या शेतात उपयोग केला. त्यांनी स्वतः येऊन सांगितले, ''अण्णा तुमच्याकडून नेलेले कलम यशस्वी ठरले.''

चार गुंठे, दहा हजार रोपे, त्यात अडीच हजार यशस्वी ही सुरुवात. आज दहा एकर जमिनीवर साडेतीन लाख रोपांची क्षमता आहे. जुन्या- नव्या अशा ३५ जातींची कलमं म्हणजे 'अतुल नर्सरी'ची 'अतुलनीय' कामगिरी होय.

पाच एकर जागेवर मातृवृक्ष तर पाच एकरांमध्ये एका एकरावर पॉलिहाऊस तसेच शेततळे. त्याचबरोबर कामगारांना राहण्यासाठी खोल्या, पाण्याचे सुनियोजित व्यवस्थापन, कार्यालय असा सारा विस्तार झाला आहे.

बी.एस्सी. ॲग्री. व एम.बी.ए. झालेला मोठा मुलगा अमोल (त्याचे मुळातले नाव अतुल) याच्या नावाने अण्णांनी 'अतुल नर्सरी' सुरू केली. एम.बी.ए. झालेला रोहित हा त्यांचा धाकटा मुलगाही मदतीला आला. ही उच्चशिक्षित जोडी नर्सरी यशस्वी करण्यासाठी अण्णांच्या खांद्याला खांदा लावून उभी राहिली. परिणामी आज अतुल नर्सरीचे नाव महाराष्ट्राबाहेरही पोहोचले आहे. नाशिक, अहमदनगर, सांगली, पुणे या आपल्या राज्यातील मोठ्या जिल्ह्यांसह कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात ही राज्ये तसेच अगदी शेजारच्या नेपाळपर्यंत येथील द्राक्ष रोपे गेली आहेत. शासनमान्य अशा या नर्सरीत अतिशय जुन्या जातींमधील भोकरी, अनाबेशाही, काळी साहेबी, फकडी, चिमासाहेबी त्याचप्रमाणे नंतर आलेल्या थॉमसन, सोनाका, गणेश, शरद, माणिकचमन, सुपर सोनाका, एसएसएन, सुधाकर, आरके, पर्पल, जंबो, मामा जंबो तसेच बाहेरच्या देशातून आलेल्या जातींपैकी फ्लेम, क्रिमसन, फॅन्टसी, शुगरवन आदी नव्याजुन्या अशा ३५ जातींची रोपे आज उपलब्ध आहेत. ■